**( 3 Hours )** **( Total Marks : 100 )**

**Please check whether you have got the right question paper.**

**N.B.:** **1)** **All** questions are **compulsory**.
**2)** **Figures** to the **right** indicate **full marks**.
**3)** **All** questions have **internal choice**.

**1.** Answer in not more than two sentences : **(20)**

a) In the definition of settlement given under Specific Relief Act, name the two instruments which are excluded.
b) State the purpose given in the Specific Relief Act, 1963 for which it can be granted.
c) Who can file a suit for possession of movable property?
d) When can a cancellation of instrument be ordered under the Specific Relief Act, 1963?
e) When is communication of acceptance said to be complete?
f) Explain the rule relating to performance of reciprocal promises.
g) State the principle laid down in the leading case Harvey vs. Facey.
h) State the grounds of discharge of contract by Mutual Agreements.
i) Define Voidable Agreements.
j) When is a person said to be of sound mind for the purpose of making a contract?

**2.** Write short notes **(any Four)** : **(20)**

a) Privity of Contract and Privity of Consideration.
b) Fraud.
c) Declaratory Decree.
d) Government Contract.
e) Rectification of Instruments.
f) Exceptions to the rule "An agreement without Consideration is Void".

**3.** Attempt **(any Two)** : **(12)**

a) Aril, went to Fun time Amusement Park and purchased a ticket. On the face of the ticket the price of the ticket and timings were written. On the back side of the ticket, history of the Amusement Park was written. Aril went for the ride called as "Hi Fi". It was a cubical for each person. On entering the cubical, it was locked. Once the ride started, on the electronic notice board in the cubical following notice appeared. "This ride is not suitable for persons below 25 years of age. The owners will not be responsible for any loss if caused to any person" and the ride started. At the end of the ride Aril was not feeling comfortable and developed back ache. On consulting the doctor, he said that it was due to the nature of the ride. Aril wants to sue the Fun time Amusement Park.

1) Is there a contractual relation between Aril and Fun time Amusement Park. If yes, what kind of Contract it is.
2) What remedy can Aril claim in the above case? Give reasons.

b) Mr. Aman took a godown on rent from Mr. Aakash in the year 2010 at a monthly rent of ₹50,000 per month for a period of five years. Mr. Aman defaulted in making payment of rent after one year. While Aman was on business trip, Aakash came with his four friends and broke the lock and put his own lock thereby pressurizing Aman to make the payment. Aman returned from USA in October, 2019 and when he contracted Aakash he refused to open the lock as he has defaulted in making payment of rent.

1) What remedy Aakash has in the above case?
2) What remedy Aman has in the above case?

c) A wants to sell his office furniture. He puts the same on OLX and write the price against the same. Mr. B who likes the furniture calls Mr. A and inquires more details. A informs his the price is not negotiable. B agrees to the price but requests A to deliver. A refuses to do the same. After few days while the furniture is still on display for sale on OLX, "B" approaches "A" again and says he is willing to buy at the same terms. A refuses to sell to B. B wants to sue A.

1) Advise B, can he file a suit against "A" for refusing to sell the furniture subsequently to B.
2) On what principle is the situation based and which is the leading case law highlighting the principle.

**4.** Attempt **any Four** questions from the following : **(48)**

1) "There are certain relations resembling to those of Contracts" - Explain.
2) What is meant by Temporary and Perpetual injunction? Discuss the circumstances under which injunction can be refused.
3) Discuss the rules related to following :
   a) Devolution of Joint Liabilities.
   b) Appropriation of Payments.
4) Explain Void Agreements. Discuss "Agreements in Restraint of Trade" and "Agreements in restraint of Legal Proceedings".
5) Explain the difference between Wagering Agreements and Contingent Contracts. Discuss the rules relating to Contingent Contract as given in the Indian Contract Act, 1872.
6) Discuss the provisions related to rescission of Contracts under Specific Relief Act, 1963.

---

**(मराठी रुपांतर)**

**( ३ तास )** **( एकूण गुण : १०० )**

**सूचना :** १) **सर्व** प्रश्न **अनिवार्य** आहेत.
२) **उजवीकडील अंक पूर्ण गुण** दर्शवितात.
३) **मूळ इंग्रजी प्रश्नपत्रिका प्रमाण** मानावी.

१. खालील प्रश्नांची दोन वाक्यात उत्तरे द्या. (२०)

अ) विशिष्ट दिलासा कायद्याअंतर्गत असलेल्या ''समझोता''च्या व्याख्यामधून वगळण्यात आलेले दोन दस्तऐवज नावे सांगा.

ब) विशिष्ट दिलासा कायदा, १९६३ अंतर्गत दिलासा मिळविण्यासाठीचा हेतू स्पष्ट करा.

क) जंगम मालमत्तेचा ताबा मिळविण्यासाठी दावा कोण दाखल करु शकतो?

ड) विशिष्ट दिलासा कायदा, १९६३ अंतर्गत दस्तऐवज रद्द करण्याचे आदेश कधी दिले जातात?

इ) प्रस्तावाची स्वीकृती कधी पूर्ण झाल्याचे समजले जाते?

फ) परस्पर अभिवचनांचे पालन करण्यासंबंधीचे नियम स्पष्ट करा.

ग) हार्वी विरुध्द फॅसी या अग्रगण्य खटल्यात मांडले गेलेले तत्त्व स्पष्ट करा.

ह) परस्पर अभिवचनाने करारातून मुक्त होण्यासाठी असलेले कारणे स्पष्ट करा.

य) ''रद्दबातल करार'' व्याख्या लिहा.

ज) करार करण्यासाठी व्यक्ती हा सकल मनाचा आहे, असे कधी म्हटले जाईल.

२. संक्षिप्त टिपा लिहा **(कोणतेही चार)** : (२०)

अ) कराराशी निगडीत व्यक्तीतील संबंध (Privity of Contract) आणि कराराशी निगडीत मोबदला (Privity of Consideration).

ब) लबाडी.

क) घोषणात्मक हुकुमनामा.

ड) सरकारी करार.

इ) दस्तऐवजाची दुरुस्ती.

फ) ''बिनामोबदला करार अवैध असतो'' ह्या नियमाचे अपवाद सांगा.

३. कारणांसहित उत्तरे द्या **(कोणतेही दोन)** : (१२)

अ) एरिल हा फनटाईम अम्युझमेन्ट पार्कमध्ये गेला आणि तिकिट खरेदी केले. तिकिटाच्या वरील बाजूस तिकिटाची किंमत आणि वेळ लिहिलेली होती. तिकिटाच्या मागील बाजूस अम्युझमेन्ट पार्क विषयी इतिहास लिहिला होता. एरिल हा 'हाय-फाय' नावाची राईडसाठी गेला. प्रत्येक व्यक्तीसाठी छोटे कक्ष होते. त्या कक्षात प्रवेश केल्यानंतर ते बंदिस्त झाले. एकदा राईड चालू झाली. त्यानंतर त्या छोट्या कक्षात असलेल्या विद्युत सूचना फलकावर खालील सूचना दिसल्या. ''२५ वर्षे खालील व्यक्तीसाठी ही राईड योग्य नाही. जर कोणत्याही व्यक्तीला नुकसान झाले, तर त्यास मालक जबाबदार असणार नाही'' आणि राईड सुरु झाली. जेव्हा राईड संपली एरिलला बरे नाही वाटले आणि त्याला पाठदुखीचा त्रास वाढला. डॉक्टरांच्या सल्लाप्रमाणे, त्याला ह्या राईडमुळे त्रास झाला. एरिलला अम्युझमेन्ट पार्क विरुध्द दावा दाखल करावसा वाटत आहे.

१) एरिल आणि फनटाईम अम्युझमेन्ट पार्क यांच्यामध्ये करारसादृश्य नाती होती का? जर हो, तर कोणता प्रकारचा करार होता.

२) एरिल हा कोणत्या उपायासाठी दावा दाखल करु शकतो, कारणे द्या.

ब) श्री. अमन याने वर्ष २०१० मध्ये श्री. आकाश कडून ₹५०,००० मासिक भाडे प्रमाणे ५ वर्षासाठी गोडावून भाडेतत्त्वावर घेतले. श्री. अमन याने एका वर्षानंतर भाडे देण्यास चुकला. जेव्हा अमन व्यापारासंबंधी भ्रमंती करत असताना, आकाश याने त्याच्या ४ मित्रासमवेत आला आणि कुलूप तोडले आणि त्याजागी स्वतःचे कुलूप लावले आणि अमन यास भाडे देण्यास दबाब टाकला. ऑक्टोबर, २०१९ मध्ये अमन यु.एस.ए. मधून परत आला आणि आकाशला संपर्क साधला. परंतु त्याने भाडे न दिल्याने कुलूप उघडण्यास नकार दिला.

१) वरील खटल्यास आकाशला कुठला उपाय आहे?

२) वरील खटल्यास अमनला कुठला उपाय आहे?

क) 'अ' यास त्याचे ऑफिसमचे सामान विकायचे आहे. हे त्याने ओ.एल्.एस्. (OLX) वर टाकले आणि त्यांची किंमत लिहिली. श्री. 'ब' यांस सदरील सामान आवडले व त्याने 'अ' ला संपर्क साधून सखोल चौकशी केली. 'अ' याने कळविले कि, किंमतीत तडजोड होणार नाही. 'ब' ने दिलेली किंमत मान्य केली. परंतु 'अ' ला डिलिव्हरी (वितरीत) करण्याची विनंती केली. 'अ' ने नकार दिला. काही दिवसानंतर देखील सामान ओ.एल्.एस्. (OLX) वर तसेच प्रदर्शित होते, पुन्हा 'ब' ने 'अ' कडे सामान विकत घेण्यासाठी इच्छा प्रकट केली. 'अ' याने 'ब' यास विकण्यास नकार दिला. 'ब' ला 'अ' विरुध्द दावा दाखल करायचा आहे.

१) 'अ' याने 'ब' ला पुन्हा सामान विकण्यास नकार देण्यासंदर्भात 'अ' विरुध्द 'ब' हा दावा दाखल करु शकतो का? सल्ला द्या.

२) वरील परिस्थिती कोणत्या तत्त्वावर आधारित आहे आणि सदरील तत्त्वे कोणत्या खटल्यामध्ये हाईलाईट झाले आहे.

४. खालील प्रश्नांची दीर्घ उत्तरे द्या **(कोणतेही चार)** : **(४८)**

१) व्यक्तीमधल काही नाती करार सादृष्य असतात, स्पष्ट करा.

२) तात्पुरता मनाई हुकूम आणि कायमस्वरुपी मनाई हुकूम म्हणजे काय? कोणत्या परिस्थितीत मनाई हुकूम नाकारले जातात.

३) खालील संदर्भात नियम स्पष्ट करा.:

अ) संयुक्त जबाबदारीचे वाटप.

ब) परत फेडीचे विनियोजन.

४) अवैध करारनामा स्पष्ट करा. व्यापार प्रतिबंध करार आणि कायदेशीर प्रक्रियेवर निबंध घालणाऱ्या करार चर्चा करा.

५) पैजेचा करार आणि घटनासापेक्ष करार मधील भिन्नता स्पष्ट करा. भारतीय करार कायदा, १८७२ अंतर्गत घटनासापेक्ष करारसंबंधीचे दिलेले नियम स्पष्ट करा.

६) विशिष्ट दिलासा कायदा, १९६३ अंतर्गत, कराराचे विखंडण करण्यासंबंधीचे तरतुदी स्पष्ट / चर्चा करा.

---